तरुण भारत रविवार ०३/२/२५

# लोकांची मने साफ होणे गरजेचे : किरण लाड




**कुंडल : सांडगेवाडीत श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना किरण लाड.**

**वार्ताहर**
कुंडल

गावातील नाले रस्ते साफ करण्याबरोबरच माणसांची मने साफ करण्याचे काम करणेही गरजेचे आहे, असे मत क्रांती दूध संघाचे चेअरमन किरण लाड यांनी व्यक्त केले.

सांडगेवाडी (ता.पलूस) येथे क्रांतीअग्रणी डॉ.जी.डी.बापूलाड महाविद्यालयातर्फे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते

किरण लाड म्हणाले, लोकांना स्वत:ची स्वच्छता स्वत: करण्याची सवय कमी झाली असून लोकांना ती सवय परत लागावी, यासाठी अशी श्रमसंस्कार शिबिरे गरजेचे आहे.

तंटामुक्ती अध्यक्ष शशिकांत सांडगे म्हणाले, आमच्या या गावाला स्वच्छतेचे पुरस्कार मिळाले आहेत. यामध्ये आपल्या महाविद्यालयाचा वाटा आहे. आम्ही आमचे गाव सतत स्वच्छ कसे राहिल, हे पहात असतो

सरपंच अमर वडार म्हणाले, माझी वसुंधरा अभियानामध्ये सांडगेवाडीचा नंबर आला आहे. यासाठी आपल्या महाविद्यालयाचे मोठे सहकार्य आहे.

यावेळी उपसरपंच शोभाताई सांडगे, शरद शिंदे, सुनील सूर्यवंशी यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

दै. तरुण भारत

दि. 03/02/2025

# युवकांसाठी श्रमसंस्कार शिबिरे महत्वाची : लाड

वार्ताहर
कुंडल

श्रमदानातून जी कामे होतात, ती शासनही करु शकत नाही, त्यामुळे श्रमसंस्कार शिबिरे महत्वाची असतात. श्रमाबरोबर सांघिक व सामाजिक संस्कार युवा पिढीवर होतात, असे मत जिल्हा बँकेचे संचालक महेंद्र लाड यांनी व्यक्त केले. सांडगेवाडी (पलूस) येथे क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते.



**कुंडल : श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलताना महेंद्र लाड.**

यावेळी शिवाजी विद्यापीठ एन. एस. एस. समन्वयक, प्रा. तानाजी चौगले, सरपंच अमर वडार, यांच्यासह उपसरपंच, तंटामुक्तीचे अध्यक्ष, ग्रामपंचायत सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य, एन. एस. एस. समन्वयक, प्राध्यापक आदी उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, श्रमसंस्कारामधून विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्व समजते, नेतृत्वगुणांना वाव मिळतो हे सांगताना महेंद्र लाड यांनी आपल्या महाविद्यालयीन जिवानात राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबारामध्ये केलेल्या बलवडीच्या क्रांती स्मृतीवनातील कामांच्या व इतर आठवणींना उजाळा देऊन महाविद्यालयीन युवकांनी शिक्षण घेताना श्रमसंस्कार शिबीरामध्ये सहभागी व्हावे, असे सांगितले. सरपंच अमर वडार यांनी गावाला मिळालेल्या पुरस्कारामध्ये महाविद्यालयाचा वाटा असल्याचे सांगितले.

दै. तरुण भारत दि. १४/०२/२०२५

# युवकांच्यावर श्रमसंस्कार होणेसाठी शिबिरे महत्वाची

## महेंद्र लाड

। ललकार वृत्त ।

कुंडल दि. १३ (वार्ताहर) - श्रमदानाने जी कामे होतात ती शासनही करु शकत नाही त्यामुळे श्रमसंस्कार शिबिरे महत्वाची असतात त्यातुन श्रमाबरोबर सांघिक व सामाजिक ही संस्कार युवा पिढीवर होतात असे मत रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष, जिल्हा बँकेचे संचालक महेंद्र लाड यांनी व्यक्त केले, ते सांडगेवाडी(पलूस) येथे क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलत होते यावेळी यावेळी एन.एस.एस.चे शिवाजी विद्यापिठाचे समन्वयक प्रा.तानाजी चौगले, सरपंच अमर वडार, यांचेसह उपसरपंच, तंटामुक्तीचे अध्यक्ष,ग्रामपंचायत सदस्य महाविद्यालयाचे प्राचार्य, एन.एस.एस. समन्वयक, प्राध्यापक आदी मान्यवर उपस्थित होते.

महेंद्र आप्पा पुढे म्हणाले महाविद्यालयाकडून आयोजित केल्या जाणार्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कारामधून विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्व समजतेच पण युवक व युवतींच्यामध्ये असलेल्या नेतृत्वगुणांना वाव मिळतो हे सांगताना महेंद्र लाड यांनी आपल्या महाविद्यालयीन जिवानातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबारामध्ये केलेल्या बलवडीच्या क्रांती स्मृतीवनातील कामांच्या व इतर आठवणींना उजाळा देऊन




सांडगेवाडी(पलूस) येथे क्रांतिअग्रणी महाविद्यालयाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलताना रयत चे उपाध्यक्ष महेंद्र लाड यावेळी उपस्थित इतर मान्यवर.

महाविद्यालयीन युवकांनी शिक्षण घेताना श्रमसंस्कार शिबीरामध्ये सहभागी व्हावे असे सांगितले.

सरपंच अमर वडार यांनी गावाला मिळालेल्या पुरस्कारामध्ये महाविद्यालयाचा वाटा असलेचे सांगितले. सात दिवस चाललेल्या या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी गावातील रस्ते, मंदिरे, स्मशानभूमी, पाण्याची टाकी इ.ठीकाणच्या स्वच्छता केली.

दै- ललकार- दि- १४/02/2024